# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

दिनांक: २४ फेब्रुवारी २०२०

भारतीय डाक
India Post

EM094980162IN IVR:697709498016
SP AZAD NAGAR S.O (MUMBAI) <400053
Counter No:1,09/03/2020,11:42
To:RAMVILAS PASWAN,ND
PIN:110001, New Delhi GPO
From:ANAND JADHAV,M
Wt:20gms
Amt:41.30(Cash)Tax:6.30
<Track on www.indiapost.gov.in>

प्रति,

मा श्री रामविलासजी पासवान,
केंद्रीय ग्राहक संरक्षण मंत्री,
भारत सरकार,
कृषी भवन, केनॉट प्लेस,
नवी दिल्ली 110001

**विषय : ग्राहक संरक्षण कायद्यातील कलम १२ मध्ये "कुठलीही गृहनिर्माण संस्था /संघटना अथवा सदनिकाधारकांचा समूह " असा समावेश होण्याबाबत निवेदन.**

महोदय,

प्रस्तुत असोसिएशन हे महाराष्ट्र राज्यातील मुंबई उपनगर जिल्ह्यातील अंधेरी उपनगरात असणाऱ्या सरदार वल्लभ भाई पटेल नगर वसाहतीमधील ३ हजार सदनिकाधारकांचे प्रतिनिधित्व करणारी संघटना आहे. सदनिकाधारकांच्या न्याय मागण्या सरकारदरबारी मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम मागील ७ वर्षांपासून असोसिएशन मार्फत केले जात आहे.

**सर्वोच्च न्यालयाने मे. सोबा डेव्हलपर च्या विरोधात दाखल करण्यात आलेला सन २०१० चा खटला निकाली काढत असताना सदनिकाधारकांच्या विरोधात न्यायदान केले आहे. असे करत असताना राष्ट्रीय ग्राहक मंचाने दिलेला निर्णयच न्यायालयाने अंतिम केला आहे. *सदर निर्णयानुसार ग्राहक संरक्षण कायद्यातील कलम १२ अन्वये पुनर्विकास / विकास प्रकल्पातील सदनी काधारकांची संघटना हि "ग्राहक" अथवा "स्वयंसेवी ग्राहक संघटना" होऊ शकत नाही हा विकासकाचा तांत्रिक मुद्दा ग्राह्य धरण्यात आला आहे. परिणामी महारेरा सह राज्य ग्राहक मंचाकडे सामूहिकपणे दाद मागण्याचा सदनिकाधारकांचा हक्कच हिरावून घेतला गेला आहे असे आमचे स्पष्ट मत आहे.* निवासयोग्य प्रमाणपत्र, अभिहस्तांतरण व तत्सम बाबींकरिता विकासकाविरोधात सदनिकाधारकांनी तक्रार दाखल केली असल्यास ती उपरोक्त निर्णयाने फेटाळली जाणार आहे. त्यामुळे ग्राहक संरक्षण कायद्यातील कलम १२ मध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे.**

***उपरोक्त कलमात "कंपनी" कायद्याखाली नोंदणीकृत करण्यात आलेली "मान्यताप्राप्त ग्राहक संघटना" म्हणजे "कुठलीही ग्राहक संघटना" अशी व्याख्या करण्यात आलेली आहे त्यामध्ये "कुठलीही गृहनिर्माण संघटना अथवा सदनिकाधारकांचा समूह" असा समावेश व्हावा अशी मागणी आम्ही तमाम सदनिकाधारकांतर्फे आपणाकडे करत आहोत ज्यामुळे सदनिकाधारकांचे न्याय प्रणालीमध्ये कायदेशीर अस्तित्व राहून न्यादानात त्यांनाही समान प्रतिनिधित्व प्राप्त होईल.***



Scanned with CamScanner

आमच्या रास्त मागणीचा आपण नक्कीच विचार करून सामान्य सदनिकाधारकाच्या न्याय हक्कासाठी योग्य असा बदल लवकरात लवकर कराल अशी आशा बाळगतो. सामान्य माणसाच्या हक्कासाठी आपण आमची विनंती मान्य करून, सदर बदलाची पूर्तता करावी, हि विनंती.

धन्यवाद,

कळावे

आपले विश्वासू

**स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन**

| | | |
|---|---|---|
| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |

**प्रत रवाना :**

मा श्री गजाननजी कीर्तिकर
शिवसेना खासदार
उत्तर पश्चिम मुंबई



Scanned with CamScanner